# जाहीर निविदा

तमाम पुरवठादार यांस याद्वारे कळविणेत येते की, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे नियंत्रणाखाली येणा-या दिवाणी न्यायालय(क.स्तर), सावंतवाडी या न्यायालयाच्या कार्यालयीन वापरासाठी आवश्यक असलेली 78" H x 36" L x 19"D या साईजची, उच्च प्रतीचे लोखंड सर्वसाधारणपणे १८/२० गेझची, पावडर कोटेड, ५ कप्पे असलेली लोखंडी कपाटे नग ५ खरेदी करणेकरीता दरपत्रके मागविणेत येत आहेत.

## अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह, तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर **"लोखंडी कपाटे खरेदी करणेकरीता दरपत्रक"** असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा-या विक्रेत्यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड,बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) दरपत्रकामध्ये लोखंडी कपाटांबाबतचे वर्णन सविस्तरपणे नमूद करावे. उदा. गेझ, पावडर कोटेड, आतील कप्पे इ. चा उल्लेख असावा. तसेच वस्तूंच्या दर्जाबाबत खात्री पुरवठादार यांनी दयावयाची आहे.

५) वर नमुद कपाटे दिवाणी न्यायालय, सावंतवाडी यांचे न्यायालयापर्यंत पोहोच करणेची जबाबदारी संबंधित पुरवठादार यांची राहील. त्याकरीता येणारा वहातुकीचा खर्च किंवा तत्तसंबंधीचा अन्य खर्च (हमाली, कर) संबंधीत पुरवठादार यांनी सोसावयाचा आहे.

६) वहातुकी दरम्यान वस्तूंचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी संबंधीत पुरवठार यांनी घ्यावयाची आहे. फर्निचरच्या वहातूकी दरम्यान वस्तूंचे नुकसान झाल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी संबंधित पुरवठादार यांची राहील.

७) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

८) सर्वात कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

९) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

१०) वर नमुद कपाटे सावंतवाडी न्यायालयापर्यंत पोहोच झाल्यानंतरच देयकाची रक्कम अदा करणेत येईल.

तरी, इच्छुक पुरवठादार यांनी आपली दरपत्रके **दि.०४/०९/२०२६** पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत.

२९/०८/२०२६

दिनांकः- २९/०८/२०२६

सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

*****

म.जा.क्र.ग्रंथा./ ५०८१ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस
दिनांकः- २९/०८/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर-

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई-मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता